Edition : XIV

A step towards Excellence
Achieve / Attain / Accomplish

**Dakshin Solapur Taluka Shikshan Mandal Sanchalit**
(Kannada Linguistic Minority Educational Institution)

# V.G. SHIVDARE COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE, SOLAPUR

Estd. June 2005



# BIOTALENT 2021-22

# संस्थापक चेअरमन



## कै. वि.मु. शिवदारे अण्णा

समाजकारण, सहकार, राजकारण व शिक्षण
यातील आपला सहवास
करुन गेला दीन दलितांचा उध्दार खास

ज्ञानाची रोवून मशाल या वाळवंटावर
दाटली आता वनराई या खडकावर

त्रिकालात अजरामर ठरो तुमची कीर्ती
प्रिती जागो पाहुनी तुमची मूर्ती



अध्यक्ष

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ



## मा.श्री. राजशेखर वि. शिवदारे

कार्य हीच उपासना



# PRINCIPAL'S DESK...

**Dr. B. N. Kamble -** Principal

I am very honored and pleased to present the Biotalent Magazine for the year 2021-22 which is a reflection of innovative, creative mind and thoughts of our students. This has always been a great platform for the students to showcase their skill, art, views and intellectual creations. The current academic year has been very demanding and challenging at various levels for student learners and academicians since the routine curriculum up to a large extent again started coming out from the shadow of COVID 19 global pandemic.

In my observation, all our students and faculty have shown a very quick adaptation towards maximum re-establishment of offline mode of curriculum implementation. Considering the importance of skill based education as per the national educational policy, our college has always been taking efforts for maximum exposure of the students to knowledge as well as skill for their overall development. In tune with the same, I am very happy to share that the Department of Biotechnology is now offering almost four different certificate courses to promote the skill based learning of students. They include the important topics Tissue Culture, Molecular Diagnostics, Probiotics, and Molecular Genomics. At the same time, the Department of Commerce has initiated a skill based certificate course on Business and Share Marketing skills. Majority of these courses are being conducted under the Skill Development Center of PAH Solapur University, Solapur. The Departments of Arts and Commerce of our college are also engaged in more practical oriented teaching as well as promoting the development of students through a number of knowledge based and social awareness activities.

In addition to this from the present academic year we have initiated a new department of Economics the benefit of students. Due to the tireless efforts of the devoted teachers, I am proud to say that our college has come up as an important educational hub for overall development of students in the faculty of Arts, Commerce and Science. Students at the age of graduation and postgraduation are at a key stage which is just prior to their introduction into the society as responsible citizens. Therefore it's necessary to promote their thoughts, views and skills through various activities and platforms. The youth nowadays are much aware of a number of social issues as well as the various angles on these issues which several times are falsely represented on the social media platform. Therefore it is also essential to provide a correct channel for students to express their thoughts, ideas and observations. This magazine Biotalent I am very sure as always will serve for the same in a very efficient way. I thank the students and staff for the enthusiastic academic participation during the year 2021-22 and wish them a very best for their future endeavors.

**- Dr. B. N. Kamble**
Principal

# जैवतंत्रज्ञान विभाग



International Conference - Lamp Lighting by Dr. Birajdar



IPR Workshop by Dr. Thakur




MOU with NBPGR - Delhi



International Conference Valedictory Function
Dr. Marathe & Dr. Yadav



Inauguration of Poster Presentation



Workshop on Proteogenomics by Dr. Shama Mujawar



Probiotics Food Festival on account of Science Day



Prize Distribution of different competitions held
on Science Day by Dr. Jyostna Sharma from NRCP

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग



रक्तदान शिबीर




श्रमसंस्कार शिबीरातील मशाल यात्रा (मौजे आहेरवाडी)




२६ जानेवारी निमित्त वृक्षारोपण



महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती



कोविड लसीकरण उपक्रम



राष्ट्रीय सेवा योजना शिबीर समारोप (मौजे आहेरवाडी)



'नेत्रदान सप्ताह' उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार

Issue: XIV Estd.: June 2005

A step towards Excellence

Achieve - Attain - Accomplish

AT

Dakshin Solapur Taluka Shikshan Mandal Sanchalit

(Kannada Linguistic Minority Educational Institution)

# V. G. SHIVDARE COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE, SOLAPUR

# BIOTALENT 2021-22

**Dr. B. N. Kamble**
Principal

**Dr. Shubhada Upase-Shivpuje**
Editor

**Magazine Committee Member**

- Prof. Bavage S. J.
- Prof. Gopika Manjunath
- Dr. Valasange A. B.
- Dr. Birajdar A. L.
- Prof. Kamble A. A.
- Mr. Habbu S. P.
- Prof. Varade V. K.
- Dr. Dhanave R. S.
- Dr. Bansode D. D.
- Prof. Manure V. S.
- Mr. Swami M. S.
- Mr. Kachare A. A.

# व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अ‍ॅड सायन्स, सोलापूर

## संचालक मंडळ

| | |
|---|---|
| मा. श्री. राजशेखर वि. शिवदारे | अध्यक्ष |
| मा. श्री. उल्हास मल्लिकार्जुन पाटील | सदस्य |
| मा. डॉ. श्री. व्ही. एस. मेतन | सदस्य |
| मा. श्री. एस. डी. येळेगांवकर | सदस्य |
| मा. श्री. मल्लिकार्जुन गं. विभुते | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे | सदस्य |

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| श्री. राजशेखर वि. शिवदारे | अध्यक्ष |
| श्री. उल्हास मल्लिकार्जुन पाटील | सदस्य |
| श्री. महादेव जगदेवप्पा पाटील | सदस्य |
| श्री. बी.एस. कुलकर्णी | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे | सदस्य-सचिव |
| सौ. गोपिका मंजुनाथ | शिक्षक-प्रतिनिधी |
| सौ. एस.जे. बावगे-ब्याळे | शिक्षक-प्रतिनिधी |
| सौ. व्ही.के. वराडे-हडपद | शिक्षक-प्रतिनिधी |
| श्री. के.बी. तांबोळी | शिक्षकेतर-प्रतिनिधी |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे नांव | | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| | प्राचार्यांचे मनोगत | | | |
| | संपादकीय | | १ | |
| | वार्षिक अहवाल २०२१-२२ | | २ | |
| १) | भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे : एक सिंहावलोकन | सामाजिक | चि. यश चव्हाण | ९ |
| २) | २१ व्या शतकात धर्माचे स्थान | सामाजिक | कु. रूपाली बिराजदार | ११ |
| ३) | युवा प्रेरणास्थान : स्वामी विवेकानंद | व्यक्तिचित्रण | चि. समर्थ अंबिगेर | १४ |
| ४) | स्वराज्य रक्षक : संभाजी महाराज | व्यक्तिचित्रण | कु. माया पवार | १५ |
| ५) | मराठी वाङ्मयाची समृध्द परंपरा | वाङ्मयीन | कु. रुपाली बिराजदार | १६ |
| ६) | स्त्री समक्षीकरण | सामाजिक | कु. अंबिका अपाने | १८ |
| ७) | भारतीय सैनिक | सामाजिक | कु. वैष्णवी आवटे | २१ |
| ८) | पुढारलेली संस्कृती | सामाजिक | कु. अविधानम्माश्री शिंपी | २२ |
| ९) | पाणी हेच जीवन | पर्यावरण | कु. भाग्यश्री जवळगी | २३ |
| १०) | स्त्री जन्म तुझी कहाणी | सामाजिक | कु. निर्गुणा राऊत | २४ |
| ११) | विमा ऑनलाईन घ्यावा की एंजटकडून - | अर्थचिकित्सक | कु. निर्गुणा राऊत | २५ |
| १२) | मुलगी जन्माला आली | सामाजिक | कु. मुस्कान अन्सारी | २७ |
| १३) | संघर्ष | ललित | चि. शुभम बमनळ्ळी | २८ |
| १४) | माझ्या आयुष्यातील पहिली स्पर्धा | अनुभव कथन | कु. अविधानम्माश्री शिंपी | २९ |
| १५) | भारतीय संस्कृती : एक महान सभ्यता | सामाजिक | चि. यश चव्हाण | ३० |
| १६) | साधं सोपं आयुष्य... साधं सोपं जगायचं | कविता | कु. रूचाली बिराजदार | ३२ |
| १७) | उंबरठा | कविता | कु. रूचाली बिराजदार | ३२ |
| १८) | प्रवास आयुष्याचा | कविता | कु. रूचाली बिराजदार | ३३ |
| १९) | आपले कोणास म्हणावे... | कविता | कु. लक्ष्मी कुंभार | ३४ |
| २०) | Flowers in the Garden | विज्ञान | Mr. Pranav Jadhav | ३४ |
| २१) | Emerging Biotechnology In Space | विज्ञान | Miss. Nellagi Anusha | ३५ |
| २२) | Plant - Sets | विज्ञान | Mr. Pranav Jadhav | ३७ |
| २३) | What is Success ? | ललित | Mr. Yash Chavan | ३८ |
| २४) | Digital India | सामाजिक | Miss. Laxmi Kumbhar | ३९ |
| २५) | Why we celebrate 'Teacher's Day' | ललित | Miss. Nirguna Raut | ४० |
| २६) | ಮಹಿಳಾ ಸಬಲೀಕರಣ | सामाजिक | कु. रोहिणी शेरीकर | ४१ |
| २७) | خوف،صدمہ اور منفی سوچ | सामाजिक | कु. सनोबर सय्यद | ४३ |
| २८) | उर्दू शायरी | कविता | कु. सबिहा टिनवाले | ४४ |
| २९) | चित्रकला व छायाचित्रे | | | ४५ |
| ✻ | राष्ट्रीय सेवा योजना विभाग अहवाल | | | ४७ |
| ✻ | क्रीडा विभाग अहवाल | | | ४९ |
| ✻ | Biotechnology Department Report | | | ५२ |
| ✻ | वाणिज्य विभाग अहवाल | | | ५३ |
| ✻ | इतिहास विभाग अहवाल | | | ५६ |
| ✻ | अर्थशास्त्र विभाग अहवाल | | | ५७ |
| ✻ | मराठी विभाग अहवाल | | | ५९ |
| ✻ | ग्रंथालय अहवाल | | | ६० |



# संपादकीय....

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ चा महाविद्यालयाचा हा वार्षिकांक आपल्या हाती देताना अतिशय आनंद होतो आहे. सर्जनशील विद्यार्थ्यांसाठी 'बायोटॅलेंट' हे एक व्यासपीठ आहे. त्यांच्यातील नवनिर्माणक्षम प्रतिभेच्या अभिव्यक्तीसाठी ही एक संधी आहे. कोरोनाच्या महामारीनंतर ऑफलाईन महाविद्यालय सुरू झाल्यानंतरचा हा पहिला अंक. त्यामुळे ही निर्मिती समोर ठेवताना निश्चितच उत्सुकता आहे.

ऋग्वेदात म्हटले आहे की 'सृजन कसे अवतरते, कुठून आणि कधी येते ?' या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांच्या व्यक्त होणाऱ्या कलागुणांकडे पाहिल्यानंतर मिळतात. विद्यार्थी हे विचारशील असतात. कलाप्रेमीही असतात. त्यांच्या लेखन, चित्रकला, फोटोग्राफी इ. विविध माध्यमातून प्रतिभेचा आविष्कार होताना यामध्ये दिसून येतो. महाविद्यालयातील विविध विभाग, वाङ्मय व अभ्यास मंडळांचे अहवाल तसेच विविध कार्यक्रमांची छायाचित्रेही यामध्ये देण्यात आली आहेत. यातून महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक घडामोडींने प्रतिबिंब त्यात उमटले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ च्या नियतकालिकातील कु. ऐश्वर्या मिराखोर (ललित लेख तृतीय), श्री. पद्मनाभ देशपांडे (कवितालेखन, द्वितीय), श्री. पवन मानेकर (फोटोग्राफी, तृतीय) या तीन लेखक विद्यार्थ्यांना पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या सृजनरंग नियतकालिक स्पर्धेत पारितोषिके प्राप्त झाली. या विद्यार्थ्यांचे व अंकाच्या संपादक प्रा. वैशाली बराडे, संपादक मंडळ, प्राचार्य डॉ. बी.एन. कांबळे या सर्वांचे हार्दिक अभिनंदन !!!

संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा. राजशेखर शिवदारे यांची प्रेरणा व मार्गदर्शन महाविद्यालयाच्या प्रत्येक घडामोडीत कायम राहिले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. बी.एन. कांबळे यांचे मार्गदर्शन व संपादक मंडळाचे उत्तम सहकार्य या अंकाला लाभले आहे. या अंकाच्या छपाईसाठी व अंक वेळेवर प्रकाशित होण्यासाठी रेणुका प्रिंटीग प्रेसचे श्री. पाटील यांनी परिश्रम घेतले. सुजाण वाचक व विद्यार्थी या अंकाकडे स्वागतशील वृत्तीने पाहतील ही अपेक्षा.

**डॉ. शुभदा उपासे–शिवपूजे**

**संपादक**

B I O T A L E N T

# वार्षिक अहवाल २०२१-२२

नमस्कार,

या संस्थेची उभारणी मोठ्या ध्येयाने, जिद्दीने, परिश्रमाने, दूरदृष्टीने केली ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी, शिक्षण महर्षी, माजी आमदार कै.वि.गु. शिवदारे अण्णांच्या पवित्र स्मृतीला विनम्र अभिवादन करतो. व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्सचा शैक्षणिक वर्ष २०२१–२२ चा १६ वा वार्षिक अहवाल आपणासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. कोरोनाच्या बिकट कालावधीमध्ये प्रतिकुल परिस्थितीत देखील महाविद्यालयाने प्रयत्नपूर्वक गुणवत्ता टिकविली आहे.

२०२१ मध्ये झालेल्या सोलापूर विद्यापीठ परीक्षांचे निकाल जाहीर झाले. आपल्या महाविद्यालयाचा निकाल उमेद, उत्साह व आशा जागवणारा होता.

| | | |
|---|---|---|
| | एम.एस्सी भाग १ : १००% | एम.एस्सी भाग २ : १००% |
| बी.ए. भाग १ : ९७% | बी.कॉम. भाग १ : ९९% | बी.एस्सी. भाग १ : १००% |
| बी.ए. भाग २ : १००% | बी.कॉम. भाग २ : १००% | बी.एस्सी. भाग २ : १००% |
| बी.ए. भाग ३ : ९५% | बी.कॉम. भाग ३ : ९५% | बी.एस्सी. भाग ३ : १००% |

सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या ७५७ इतकी आहे. त्यामध्ये बी.ए.– १४८, बी.कॉम – ३४५, बी.एस्सी – १८० व एम.एस्सी – ८४ अशी विविध विभागातील विद्यार्थ्यांची संख्या आहे. आमच्या महाविद्यालयात एकूण अधिव्याख्याते – २८ आहेत. त्यापैकी सेट, नेट उत्तीर्ण – ११ तर एम. फील व पीएच.डी धारक – ८ आहेत.

आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाने उत्कृष्ट कार्य केले आहे. पु.अ. हो सोलापूर विद्यापीठ, सोलापूरची २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातून युनिटला नवीन ५ एककाची मान्यता मिळाली आहे. १०–०८–२०२२ रोजी कै.वि.गु. शिवदारे अण्णांच्या ५० व्या जयंतीनिमित्त व दि. ०७–०४–२०२२ रोजी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. राजशेखर शिवदारे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरांमध्ये १४८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर २७४ विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. ‘आझादी का अमृत महोत्सव’ अंतर्गत डॉ. किशोर जोगदंड, डॉ. प्रदीप वाघमारे यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. ‘जागर स्त्रीशक्तीचा’ अंतर्गत मा. अंजली धानोरकर, संविधान दिनानिमित्त डॉ. महेश शिरापूरकर, डॉ. बाबासाहेब महापरिनिर्वाण दिनानिमित्त मा. नूरखाँ पठाण यांची व्याख्याने झाली. १५ डिसेंबर रोजी डॉ. सोनाली घोंगडे ‘आहार हेच औषध’ या विषयावर मार्गदर्शन झाले. स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त ‘स्वामी विवेकानंद व आजचा युवक’ या विषयावर १२ जानेवारी रोजी मा. श्री. सागर मुत्तगी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. ‘राष्ट्रीय सेवा योजना कार्य सप्ताह’ निमित्त प्राचार्य डॉ. बी.एन. कांबळे यांचे व्याख्यान झाले. ‘माझी वसुंधरा’ अभियाना अंतर्गत ४५० बांबूची झाडे महाविद्यालय व परिसरात लावण्यात आली. महाविद्यालयात ‘युवास्वास्थ्य कोविड – १९ लसीकरण मोहिम’ राबविण्यात आली.

१२७ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. नेत्रदान सप्ताहानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय यांच्या वतीने निबंध स्पर्धा व पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विशेष श्रमसंस्कार शिबीर दि. १३ मार्च ते १९ मार्च दरम्यान मौजे आहेरवाडी येथे घेण्यात आले. सदर शिबीरात ७२ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. शिबीरामध्ये श्रमदान, प्रबोधनपर व्याख्याने, मशाल यात्रा या माध्यमातून गावकऱ्यांना व्यसनमुक्ती, स्वच्छता, स्त्री शिक्षणाची आवश्यकता, पर्यावरण इ. विषयांवर जनजागृती करण्यात आली. नियमित कार्यक्रमांमध्ये विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त वेबिनार व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. तसेच स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या सर्व उपक्रमांसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. मणुरे व प्रा. बावगे यांनी परिश्रम घेतले.

कॉमर्स विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. वि.गु. शिवदारे अण्णा यांच्या स्मृती समारोहानिमित्त १६ ऑगस्ट रोजी मा.श्री. मनोहर पुराणिक यांचे 'वित्तीय सेवा व गुंतवणुक' या विषयावरील वेबिनारचे आयोजन करण्यात आले. बी.कॉम. भाग – ३ च्या बदलत्या अभ्यासक्रमावर आधारित विद्यापीठस्तरीय कार्यशाळा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. या कार्यशाळेत डॉ. शेंडगे, प्रा. इंगळे, डॉ. दामाजी, अॅड. माने यांनी मार्गदर्शन केले. एल.बी.पी.एम. महाविद्यालयाबरोबर झालेल्या MOU अंतर्गत प्रा. इंदुमती चोळ्ळे यांनी वेबिनार द्वारे मार्गदर्शन केले. तसेच डॉ. अनिता बिराजदार यांनी एल.बी.पी.एम. महाविद्यालयातील विद्यार्थिनींना 'बँकिंग क्षेत्रातील नवीन प्रवाह' या विषयावर मार्गदर्शन केले. बी.कॉम. भाग – ३ च्या विद्यार्थ्यांसाठी 'Certificate course of share market & trading analysis' हा कोर्स घेण्यात आला. या कोर्सचा १२२ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या कोर्सचे उद्घाटन एच.एन. कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्रा. इंगळे सर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शेअर मार्केट संदर्भात पोस्टर्स सादर केले. ४ फेब्रुवारी रोजी 'केंद्रिय बजेट २०२२' या विषयावर पु.अ. हो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर मधील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रकाश व्हनकडे यांनी ऑनलाईन पध्दतीने मार्गदर्शन केले. 'बौध्दिक स्वामित्व हक्क' या विषयावर असिस्टंट ऑफ पेटंट ऑफिस, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मुंबईचे डॉ. अजय ठाकूर यांनी ४ मार्च २०२२ रोजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधून १५ मार्च रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. Com fest - 2022 च्या माध्यमातून रांगोळी स्पर्धा, पोस्टर प्रेझेंटेशन व प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांना उद्घाटक व परीक्षक म्हणून प्रा. इंदुमती चोळ्ळे, प्रा. जगताप यांची उपस्थिती होती. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांची श्री. सिध्देश्वर सहकारी बँक, मुख्य शाखा व श्री. स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणी, वळसंग या ठिकाणी शैक्षणिक व औद्योगिक भेट देण्यात आली. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. वराडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरील सर्व उपक्रम यशस्वी करण्यात आले.

क्रीडा विभागातर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले. वि.गु. शिवदारे आण्णांच्या स्मृती समारोहानिमित्त ऑनलाईन वुशू स्पर्धा घेण्यात आल्या. सदर स्पर्धेत ११० खेळाडूंनी सहभाग घेतला. जागतिक महिला दिनानिमित्त दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संकुलातील विद्यार्थिनींसाठी 'स्वसंरक्षण गरज व महत्त्व कार्यशाळा आणि वेबिनार' चे आयोजन सोलापूर शहर व जिल्हा लाठी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. २०६ विद्यार्थिनींनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. पु.अ. हो, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, तर्फे आंतरमहाविद्यालयीन पुरुष व महिला तलवारबाजी निवड चाचणी घेण्यात आली. त्यात महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची निवड झाली. पु.अ. हो, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आंतरमहाविद्यालयीन अॅथलॅटिक्स निवड

चाचणीत दोन विद्यार्थ्यांची निवड झाली. पु.अ.हो, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर तर्फे आंतरमहाविद्यालयीन हँडबॉल महिला निवड चाचणीत दोन विद्यार्थिनींची निवड झाली. पु.अ.हो, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आंतरमहाविद्यालयीन तायक्वांदो पुरुष व महिला निवड चाचणीत तीन विद्यार्थिनींची निवड झाली. उपप्राचार्य व क्रीडा विभागप्रमुख प्रा.एम.बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरील विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

कला शाखेमध्ये विविध वाङ्मय मंडळ व अभ्यास मंडळाच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. इतिहास विभागातर्फे शिवजयंती निमित्त प्रश्नमंजुषा, किल्ला प्रतिकृती तयार करणे व चित्रकला या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यमाने नियमित कार्यक्रमांमध्ये विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त वेबिनार व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. प्रा. बावगे यांनी या सर्व कार्यक्रमांसाठी परिश्रम घेतले. मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळातर्फे विविध, नाविन्यपूर्व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. १९ जून २०२१ रोजी मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या वतीने 'मराठी वाचन दिन' साजरा करण्यात आला. 'भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त १७ जानेवारी रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. २८ जानेवारी २०२२ रोजी मराठी विभाग व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने माजी विद्यार्थी व लेखक, कवयित्री, कु. अश्विनी लिके, श्री. अमोगसिध्द पुजारी यांची आभासी पध्दतीने मुलाखत घेण्यात आली. ही मुलाखत प्रा. शुभदा उपासे–शिवपूजे व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शिवानंद घोंगडे यांनी घेतली. 'मराठी राजभाषा दिनानिमित्त' डॉ. ऋषिकेश धनवे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन व महिला कक्ष च्या संयुक्त विद्यमाने दि. २१ एप्रिल रोजी 'विद्यार्थिनींसाठी आरोग्य प्रबोधन कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले. नव्याने सुरु झालेल्या अर्थशास्त्र विभागाचे उद्‌घाटन पु.अ.हो, सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी 'अर्थश्री' या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. ११ एप्रिल रोजी बी.ए. भाग – ३ च्या विद्यार्थ्यांसाठी 'Certificate course in financial market' चे उद्‌घाटन एच.एन. कॉलेज ऑफ कॉमर्सचे डॉ. श्रीनिवास जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. ११ एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान अर्थशास्त्र विभागातर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. बी.ए. भाग – ३ च्या विद्यार्थ्यांची श्री. स्वामी समर्थ सहकारी सूत गिरणी, वळसंग या ठिकाणी औद्योगिक भेट देण्यात आली. प्रा.एम.बी. कांबळे यांनी दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स येथील विद्यार्थ्यांसाठी 'बँकिग क्षेत्रातील सुधारणा व सद्यस्थिती' या विषयावर ऑनलाईन पध्दतीने व्याख्यान दिले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शिवानंद घोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपारिक वेशभूषा दिन, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

संस्थेच्या व महाविद्यालयाच्या यशात जैवतंत्रज्ञान विभागाचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. या वर्षी विभागातर्फे बी.एस्सी. व एम.एस्सी. च्या वर्गांसाठी ५ नवीन 'सर्टिफिकेट कोर्स' सुरु करण्यात आले. दि. ६ जानेवारी रोजी पु.अ.हो, सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या संयुक्त विद्यमाने 'Emerging perpectives in biotechnology - 2022' या विषयावर आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले. या कॉन्फरन्समध्ये अमेरिकेतील डॉ. श्रीनिवास नरसिपूरा, डॉ. गुरुलिंग स्वामी यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. 'IPR awareness' या विषयावर NIPAM या संस्थेच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले. या वेबिनार मध्ये दिल्ली येथील डॉ. उज्वल यांनी मार्गदर्शन केले. 'IPR and patent awareness' या

विषयावरील कार्यशाळा आयोजन करण्यात आली. तसेच इंटरनॅशनल ओझोन डे, नॅशनल सायन्स डे यानिमित्ताने पोस्टर प्रेझेंटेशन, जैवतंत्रज्ञानावर आधारित पाककृती, रांगोळी, प्रश्नमंजुषा वगैरे विविध स्पर्धांचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना संशोधन तसेच प्रशिक्षणाच्या दृष्टीने वाव मिळावा या हेतूने जैवतंत्रज्ञान विभागाने राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर, सायकॅब मोहाली, भारतीय कदन्न अनुसंधान संस्थान, सोलापूर व आधार लाईफ सायन्सेस, सोलापूर इत्यादी संस्थांसमवेत सामंजस्य करार केलेल्या आहे. यावर्षी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर यांच्या बरोबरील करारांतर्गत एम.एस्सी. च्या तीन विद्यार्थ्यांनी प्रकल्प पूर्ण केलेले आहेत. तसेच पुणे येथील 'श्रध्दा साई बायोटॅक लॅब' येथे १२ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले. बी.एस्सी. भाग – ३ चा श्री. विनायक म्हेत्रे हा विद्यार्थी JAM - 2021 या परीक्षेस पात्र ठरला. कॅंपस निवडी अंतर्गत SSLS पुणे या कंपनीमध्ये तीन विद्यार्थ्यांची निवड झाली तर सिरम इन्स्टिट्युट मध्ये दोन विद्यार्थ्यांची निवड झाली. 'Stelis Biofarma, Bengaluru' व 'Praj Industries, Pune' या कंपनीमध्ये एकेका विद्यार्थ्याची निवड झाली. डॉ. गोपिका मंजुनाथ व सर्व प्राध्यापक वर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली वरील सर्व उपक्रम यशस्वी करण्यात आले.

महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. महेश स्वामी हे २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत 'ग्रंथालय व माहितीशास्त्र' या विषयात उत्तीर्ण झाले. महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख प्रा. शुभदा उपासे–शिवपूजे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ची मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्राप्त झाली. महाविद्यालयातील आर्टस्, कॉमर्स, जैवतंत्रज्ञान या सर्व शाखांमधील प्राध्यापकांनी शैक्षणिक वर्षात गुणवत्ता वाढीसाठी विविध वेबिनार मध्ये सहभाग नोंदविला.

महाविद्यालयाचा आत्मा म्हणजे ग्रंथालय आहे. 'ग्रंथ हाच गुरु' म्हणून आम्ही ग्रंथालयाचा विकास करीत आहोत. महाविद्यालयीन ग्रंथालये DELNET (Developing Library Network) व NDL (National Digital Library) Electronic स्वरुपातील ज्ञानाचा संग्रह यामध्ये E-Journal व E-Books असे दर्जेदार ग्रंथसंग्रह आहेत. ग्रंथालयाने Digital Library व Research Cell याद्वारे महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थी यांच्याकरिता इंटरनेट व वाय फाय उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय ग्रंथालयाने Library Automation साठी E-Granthalay व Soul 2.0 Software घेतलेले आहे. ग्रंथालयातर्फे बुक बँक योजनाही राबविण्यात येत आहे. ग्रंथालयात एकूण क्रमिक पुस्तकांची संख्या ६४४५ व नियतकालिकांची संख्या ३६ एवढी आहे. दैनंदिन वृत्तपत्रांची संख्या १० आहे.

या बरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, मुलाखत तंत्र, संभाषण कौशल्य, कॅंपस इंटरव्ह्यू यासारखे उपक्रम राबविले जात आहेत. प्राचार्य या नात्याने शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये क्षेत्रात यश संपादन केलेले विद्यार्थी व प्राध्यापकांचे अभिनंदन करून त्यांच्या वाटचालीस व परीक्षेसाठी शुभेच्छा देऊन हा अहवाल इथेच संपवतो. धन्यवाद !!!!!

**– प्राचार्य**

**डॉ. बी.एन. कांबळे**

# अभिनंदन



**डॉ.सौ. शुभदा उपासे-शिवपूजे**
मराठी विषयातील पी.एच.डी
पदवी प्राप्त



**श्री. महेश सुर्यकांत स्वामी**
एम.सेट (ग्रंथालय व माहितीशास्त्र)
परीक्षा उत्तीर्ण

# गुणवंत विद्यार्थी

## एम. एस्सी. (बायोटेक) भाग १



**कु. कोळी स्नेहल**
**८१.४४ % प्रथम क्रमांक**



**कु. थोरात प्राजक्ता**
**७८.८८ % द्वितीय क्रमांक**



**चि. स्वामी अभिषेक**
**७७.५२ % तृतीय क्रमांक**

## एम. एस्सी. (बायोटेक) भाग २



**चि. जाधव आकाश**
**८६.०८ % प्रथम क्रमांक**



**चि. चितली शिवशंकर**
**८५.९२ % द्वितीय क्रमांक**



**चि. कुलकर्णी निखिल**
**८५.४४ % तृतीय क्रमांक**

# गुणवंत विद्यार्थी

## बी. ए. भाग १






कु. पवार माया निलप्पा
८४.३३ % प्रथम क्रमांक

कु. कलागते अर्पिता दत्तात्रय
८४.३३ % प्रथम क्रमांक

चि. पवार अजय टोपु
८३.६७ % द्वितीय क्रमांक

चि. चव्हाण यश महादेव
८२.१७ % तृतीय क्रमांक

## बी. ए. भाग २





कु. अलसंदे नागरबाई रमेश
८४.०२ % प्रथम क्रमांक

कु. भिंगे शिवानी सुखदेव
८३.०८ % द्वितीय क्रमांक

कु. बागदुरे रेवती
८३.०० % तृतीय क्रमांक

## बी. ए. भाग ३





कु. गोब्बूर अश्विनी इरण्णा
८९.८३ % प्रथम क्रमांक

कु. साबा भारती हणमंत
८९.६६ % द्वितीय क्रमांक

कु. शिराळकर प्रियंका औदुंबर
८९.०८ % तृतीय क्रमांक

BIOTALENT

# गुणवंत विद्यार्थी

## बी. एस्सी. (बायोटेक) भाग १



कु. हिंगणी सानिया
८६.७५ % प्रथम क्रमांक



कु. दुबे सोनिया
८४.४२ % द्वितीय क्रमांक



कु. कांबळे मनिषा
८४.०८ % तृतीय क्रमांक

## बी. एस्सी. (बायोटेक) भाग २



कु. बिद्री मुनाज
८९.३३ % प्रथम क्रमांक



चि. बागवान अमान
८९.२२ % द्वितीय क्रमांक



कु. पिशानतोट नुतन
८९.११ % तृतीय क्रमांक

## बी. एस्सी. (बायोटेक) भाग ३



चि. म्हेत्रे विनायक
८६.०८ % प्रथम क्रमांक



चि. शेख अब्दुल्ला
८५.१२ % द्वितीय क्रमांक



कु. गायकवाड वैष्णवी
८४.७२ % तृतीय क्रमांक



# भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे : एक सिंहावलोकन

''एकच तारा समोर,
आणिक पायतळी अंगार,
गर्जा जयजयकार क्रांतीचा,
गर्जा जयजयकार !''

कवी कुसुमाग्रज रचित या काव्यपंक्तीचे सार्थक होण्यास १५ ऑगस्ट १९४७ चा दिवस उगवला आणि हालअपेष्टांनी जखडलेल्या पिंजऱ्यातून पक्षी स्वतंत्र झाले. स्वातंत्र्याची सुवर्णप्रभात झाली. असंख्य क्रांतिकारांच्या प्राणाहुतीचे सार्थक झाले, भारतमातेची पारतंत्र्यातून मुक्तता होऊन स्वातंत्र्यप्राप्ती झाली. 'वंदे मातरम्' या जयघोषात मिळवलेले स्वातंत्र्य शाश्वत टिकविण्याच्या प्रयत्नाला आता ७५ वर्षांचा कालखंड पूर्ण झाला व भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाला प्रारंभ झाला.

स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवाचे सिंहावलोकन करताना आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती? कोणत्या अपेक्षा होत्या ? आज सत्य परिस्थिती काय आहे? उणिवा काय राहिल्या व भविष्यात कशी पावले उचलावी? या बाबींचा आढावा घेणे महत्वाचे आहे. कोणत्याही देशाला प्रगतीपथावर पोहविण्यासाठी त्या राष्ट्राची प्राकृतिक रचना कारणीभूत ठरते. त्यामुळे भारतीय संपन्नतेचा अद्विितीय घटक म्हणजे भौतिक प्रदेश. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती व खनिज समृध्द देश आहे. माथी जगविख्यात हिमालय पर्वतरांगा व पायी सागरी सहवास लाभला आहे. देशातुन वाहणाऱ्या गंगा, ब्रम्हपुत्रा, गोदावरी या नद्यांमुळे कृषिउत्पन्नाला अनन्यसाधारण जोड मिळाली. सैनिक डोळ्यांत तेल घालून देशसीमेचे रक्षण करताहेत. किसान लोकराजा बनला आहे. या भारतभूला काश्मीर, उटी, शिमला, कुलु मनाली, राजस्थान सारखी समृध्द पर्यटन स्थळे लाभली आहेत. एकंदरीतच आपला भारत देश 'सुजलाम् सुफलाम्' आहे.

भारताला उत्तम प्राकृतिक रचनेबरोबरच पौराणिक व ऐतिहासिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. ज्याप्रमाणे हिरे, मोती, रत्नांनी सजलेले हार सौंदर्याला शोभा देते, तसेच अगणित जाती, धर्म व भाषांच्या जनतेमुळे आपल्या धरणीला अनोख्या सौंदर्याची प्राप्ती होते. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर यांसारखी संतमंडळी तसेच राष्ट्रपिता म. गांधी ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, राजा राममोहन रॉय यांसारख्या समाजसुधारकांची भूमी असलेल्या भारताची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ मानली जाते.

''श्रीरामाचे, श्रीकृष्णाचे अजून आहे स्मरण मनास,
वीर शिवाजी, प्रताप, लक्ष्मी थोर आमुचा हा इतिहास.''

या ओळींप्रमणोच महान योध्दा महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज, स्त्रीशक्तीचे प्रतीक राणी लक्ष्मीबाई यांच्या इतिहासाने गौरवान्वित झालेला भारत एकाचवेळी अध्यात्मात व विज्ञानातही अग्रेसर होत आहे. अनेक खेळप्रकारांत भारताने जागतिक दर्जाची कामगिरी केली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली ७५ वर्षे साहित्य, कला, संस्कृती या क्षेत्रांमध्ये नामवंत लेखक, साहित्यिक व कलावंतांनी आपला ठसा उमटविला आहे.

भारताने गेल्या ७५ वर्षांत प्रत्येकच क्षेत्रात अनमोल कामगिरी केली; परंतु ज्याप्रमाणे नाण्याला दोन बाजू

असतात, तसेच भारतालाही अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागते आहे. गुलामगिरीतून स्वातंत्र्यवाट बनविण्यासाठी कित्येक शुरवीरांनी आपले तारुण्य खर्चिले, रक्ताचा सडा सांडला. पण आजच्या युवकांना त्याविषयीच्या कृतज्ञतेची जाण नाही, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. आज चीन–पाकिस्तान सारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. देशांमध्ये दहशतवादी हल्ले होतात. उरी, पुलवामा सारख्या रक्ताळलेल्या आठवणी आपल्याला दु:ख देतात. कित्येक शेतकऱ्यांना स्व–हक्कांसाठी आंदोलन करावे लागते. स्वर्गसमान काश्मीर गुलाबाच्या सुगंधाने दरवळत राहण्याऐवजी रक्तात रंगताना पाहायला मिळतो. एकाच आईची लेकरे धर्माच्या नावावरून जातीय दंगली करत असतील, एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतील तर त्या आईची काय अवस्था असेल? भ्रष्टाचाररूपी यंत्रणेमुळे जळणाऱ्या झोपडीचे दृष्य नरजेस पडणे हे दुर्दैवच.....!

''मानव सारे समान असती
शिकवण ही जगतास दिली,
या मातेची मुले सद्गुणी
सर्व जगाला प्रिय झाली ।''

ही काव्यपंक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुभाषचंद्र बोस, लोहपुरुष वल्लभभाई पटेल या देशप्रेमी नेत्यांच्या कार्याला खऱ्या अर्थाने साजेशी ठरते. त्यामुळे भारत नावाच्या ज्योतीच्या तेजाने जगाला उजळवण्याचे काम आजच्या नेते मंडळींनी करणे अत्यावश्यक आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लाखो स्त्रियांनी घर–संसार त्यागून, अनिष्ट परंपरावादी बेड्या तोडून स्वत:च्या रक्ताने स्वातंत्र्याचा इतिहास रचला; परंतु तीच स्त्री आज या देशात सुरक्षितता अनुभवते? देशासाठी फासावर चढणाऱ्या, चौदाव्या वर्षी बंदुकीची गोळी झेलणाऱ्या तरुणांचा त्याग २१ व्या शतकातील युवकांना जाणवेल का? 'सत्यमेव जयते' हे ब्रीदवाक्य असलेली भारमाता आज असत्य व दुष्ट प्रवृत्तींमुळे शोकग्रस्त होत चालली आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवात आपल्याला एक गोष्ट मान्य करावीच लागेल की, मृत्युच्या विळख्यात अडकलेल्या मानवाला अमृतप्राप्ती व्हावी. तसे गुलामगिरीत जखडलेल्या जनतेला या स्वातंत्र्यानेच जीवनदान दिले आहे. परंतु जो असमाधनाचा, असंतोषाचा सूर निघत आहे, त्याला आपणच जबाबदार आहोत. आपली आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक प्रगती झाली, पण नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत गेला. म्हणूनच वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गाने झपाट्याने परिवर्तन करीत आहोत; परंतु त्याच वेळी दुसऱ्या बाजुने वेगाने वाढणाऱ्या भौतिक व अभौतिक समस्यांच्या दुष्ट विळख्यात आपण अडकल्याने स्वातंत्र्याचा श्वास गुदमरतोय.... त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्वतंत्र भारताला सुसमृध्द बनविण्यासाठी समाज जागृत होणे काळाची गरत आहे.

''स्वातंत्र्याच्या अमृत वर्षी
समाज जागृत होईल,
जगात साऱ्या भारतभूचे
स्थान बाधित राहील!''

**– श्री. यश महादेव चव्हाण**
बी.ए. भाग–२

## २१ व्या शतकात धर्माचे स्थान



धारणात् धर्ममित्याहू: धर्मो धारयते प्रजाः
यत् स्थात् धारणसंयुक्तम् स धर्म इति निश्चयः ।।

मुळात धर्माची स्थापना का झाली असावी ? माणूस गुहेतून बाहेर आला समुदाय करून रहायला लागला, शेती करायला लागला. त्यावेळी समाजात अर्थातच राजसत्ता नव्हती जर कोणी दुसऱ्यावर अन्याय केला तर त्याबद्दल जाब विचारायला काही यंत्रणा नव्हती. बळी तो कान पिळी असाच न्याय त्यावेळी असायचा. समाजातील लोकांना लगाम घालणारी एखादी यंत्रणा असावी, असे वाटायला लागले. यातुनच नक्की कोणती वर्तवणूक योग्य आणि कोणती अयोग्य याबद्दल नियमावली आली. पुढे पाप–पुण्याची आणि संगळ्यांच्या पाप–पुण्याचा हिशोब ठेवणारी शक्ती म्हणून देवाची संकल्पना पुढे आली. नंतरच्या काळात या नियमांमध्ये कालपरत्वे बदल करून त्यात भर टाकून एक प्रकाराची आचारसंहिता तयार झाली. यालाच धर्म असे म्हटले गेले.

सध्याच्या काळात माणसांची मोबिलिटी आहे. तेवढ्या प्रमाणात पूर्वीच्या काळी नव्हती, तसेच सर्व कामे हातानेच करायला लागत. तेव्हा ही कामे गावातल्या गावातच करून द्यायला जीवनाची एक गरज म्हणून सूतार, लोहार, सोनार आणि इतर कामे करणारे बलुतेदार आले. लिहायला, वाचायला शिकवणे हा एक पेशा आला आणि इतर कामे करायला विविध व्यवसाय आले आणि या सगळ्या पेशांतील लोकांनी नियमावली केली.

पाश्चात्त्यांसाठी तसेच पाश्चात्त्य विचारांच्या व शिक्षणाच्या प्रभावाखाली आल्यामुळे ज्यांना स्वतःच्या परंपरेची नीट ओळख झालेली नसते अशा भारतीयांसाठी 'धर्म' ही संकल्पना समजून घेणे विशेष करून महत्त्वाचे आहे. कारण त्या संकल्पनेमध्ये हिंदुस्तानच्या बहुसंख्य नागरिकांची विचारशैली व जीवनशैली घडविल्याने धर्माला खोल अर्थ प्राप्त झाला आहे. धर्माचे समीकरण बंधनाशी किंवा कर्तव्याशी जोडले जाते. धर्माचा अत्यंत महत्त्वाचा व मूलभूत अर्थ की मानवजगत हा एक अंश आहे, अवघ्या विश्वाला एकत्र धरून आणि सांभाळून ठेवणारे तत्व, प्रत्येक गोष्ट जशी असते तशी तिला बनविण्याची प्रवृत्ती हा तिचा धर्म असतो. धर्म म्हणजे संपूर्ण जगताच्या व्यापाराचा नियम व व्यवस्था.

### धर्म विश्वस्य जगत : प्रतिष्ठा

धर्म हा साऱ्या विश्वाच्या प्रत्यक्ष पायाच आहे. त्याला विश्वव्यापी संदर्भ आहे, सामान्यतः ज्यामुळे ऐहिक व पारमार्थिक कल्याण साध्य होतो. तो धर्म निसर्गातील अत्यंत पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्याशी संबंध, जीवन व विश्व अथवा निसर्ग यांची नियंत्रक अशा अलौकिक शक्तीवर माणसाची श्रध्दा असते त्या शक्तीचा स्वतःशी अनुकूल पवित्र व घनिष्ठ संबंध स्थापित करणारी वैयक्तिक अथवा सामाजिक मनःप्रवृत्ती व त्यातून निघणारी आचरणपद्धती म्हणजे धर्म होय. जीवन परिपूर्ण व कृतार्थ करणारी हे अपरिपूर्ण, दोषमय, अशांत जीवन बदलून टाकणारी उच्चतम ध्येयाचा म्हणजे दिव्यत्ताच्या प्राप्तीची पध्दत म्हणजे धर्म.

धर्म एका जीवनमार्गाचा किंवा जीवनाच्या अनेक मार्गांना आणि मुक्तीच्या मार्गांना मान्यता देण्याचा उल्लेख करतो. ''ऋग्वेदीय उताऱ्यांच्या बहुतांश बाबतीत धर्माचा अर्थ धार्मिक अध्यादेश किंवा धार्मिक विधी असा आहे.'' एकूण परिस्थिती विचारात घेता अस्तित्वात असलेली प्रत्येक वस्तू ही अंशतः तटस्थ लाभार्थी असते तसेच ती अंशतः क्रियाशील साधन असते. असीम गुंतागुंतीच्या या परस्पर संबंधाच्या परिणामालाच नैसर्गिक समतोल किंवा ऐक्य हे नाव आहे. प्रत्येक गोष्टीचा असा तोल सांभाळून ठेवण्याला धारणा–धर्म म्हणतात. बुध्द, तुकाराम आणि उपनिषदे यांनी त्याला सत्याशी एकरूप मानले. धर्म म्हणजेच सत्य आणि सत्य हाच धर्म होय. धर्म नष्ट करण्यासाठी नव्हे तर अधिक सदृढ करण्यासाठी आलेला, त्याच्या धर्माच्या धुसर झालेल्या पैलूंवर अधिक प्रकाश

टाकणारा एक नवा महर्षी मानला. महाभारतातील युधिष्ठराला धर्मराज या नावाने ओळखतात. भगवान विष्णूला धर्माध्यक्ष नावाने ओळखतात. धर्म मूलतः मनूष्यांचा किंवा वस्तूचा निश्चित स्वभाव दर्शवितो.

धर्म नावाची ही अशी एक संकल्पना आहे की जीने आजपावतो जगातील कोट्यावधी लोकांना सुख, शांतता व समाधान दिले. त्यासोबतच धर्मानेच आजपर्यंतची सर्वात मोठी मनुष्यहानी केली आहे. 'धर्म' दोन अक्षरी शब्द. विश्वात घडणारी प्रत्येक गोष्ट धर्मानुसार पाहिली जाते. जेव्हापासून धर्म ही संकल्पना रूजली, त्या क्षणापासून आज धर्माचे हळूहळू बदलते रूप पाहावयास मिळते धर्माबद्दल अनेक भाषेत वेगवेगळी संकल्पना मांडली आहे. धर्म ही सत्याच्या ज्ञानावर आधारित आहे. कोणी धर्माला डोक्यावर घेऊन नाचतो. अगदी प्रत्येक गोष्टीसाठी धर्माचा विचार करतो, तर एका बाजूला आजची पिढी, धर्म म्हणजे काय? असा प्रश्न करते कोण धर्माबद्दल सांशक असतं तर कोणी धर्माबद्दल निश्चीत असतं. धर्म ही संकल्पना बदलत जात आहे.

आजच्या काळात वास्तवात धर्माचे स्थान काय? अगदी विचार केला तर आज धर्माचे स्थान कमी होऊन त्याचे स्थान कर्मकांड आणि अंधश्रध्देने घेतले आहे. आज दिवसेंदिवस माणूस धर्माच्या नावाखाली धर्माचे अवडंबर करतोय, त्याला सत्य माहित नाही, म्हणून तो अंधश्रध्देच्या जाळ्यात अडकत जात आहे. 'धर्म म्हणजे सत्याचे ज्ञान'. ज्ञान देणे हेच धर्माचे स्वरूप आहे. मंदिरापासून ते मठापर्यंत धर्माला ऐवज म्हणून अंधश्रध्दा, कर्मकांड चालू आहे. जगात अनेक धर्म प्रचलित आहेत. त्याचे दोन वर्ग पडतात. एक वर्ग म्हणजे व्यक्तीवर आधारलेल्या धर्माचा आणि दूसरा वर्ग म्हणजे शास्त्रावर आधारलेला होय. धर्म मूलतः मनुष्यांचा किंवा वस्तूचा निश्चित स्वभाव दर्शवितो. आजच्या बदलत्या धर्माच्या संकल्पना अगदीच वेगळ्या आहेत.

२१ व्या शतकात बदलत्या धर्माच्या संकल्पना आणि माणसाची वैचारिकता यांचा संबंध वेगळा आहे. स्पर्धेच्या जगात प्रत्येकजण पुढे जाण्याच्या मागे लागला आहे. पण इथे, मी पुढे जाणार यापेक्षा समोरचा व्यक्ती मागे कसा सरसवायचा यामागे प्रयत्न चालू आहेत. पण आज वैचारिकता बदलायची असेल तर आपल्याला धार्मिकतेकडे वेगळ्या पध्दतीने पहायला हवे. आपली मानसिकता जपण्यासाठी धार्मिक विचार धर्मानुसार केले पाहिजे.

भारतातील धर्म हे धार्मिक श्रध्दा आणि प्रथा यांच्या विविधतेने ओळखले जातात. भारतातील धर्मनिरपेक्षतेचा अर्थ म्हणजे राष्ट्रासाठी सर्व धर्म समान आहेत. १९७६ सालच्या ४२ व्या घटना दुरुस्तीच्या कायद्यानुसार भारत एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. भारतीय उपखंड हा हिंदू सभ्यता संस्कृतीचा, बौध्द, जैन, वैदिक आणि शीख या जगातील चार प्रमुख धर्माचे जन्मस्थान आहे. संपूर्ण भारताच्या इतिहासात 'धर्म' हा देशाच्या संस्कृतीचा महत्त्वाचा भागा आहे. कायदा आणि सुव्यवस्था द्वारे देशांमध्ये धार्मिक विविधता आणि धार्मिक सहिष्णूता ह्या दोन्ही गोष्टी जपल्या, जातात; भारताच्या संविधानाने धर्म स्वातंत्र्याचा हक्क हा मुलभूत अधिकार म्हणून घोषित केला आहे. जवळजवळ ९३% भारतीय आपापल्या धर्माचे पालन करताना आढळतात.

महाभारतानुसार ''ध्रियते लोकोनेनेति धर्मः । धारनाद् धर्ममित्याहु:र धर्मो धारयते प्रजा : ।।'' अर्थात 'समाज व प्रजा धारण करण्याचे सामर्थ्य ज्याच्या ठायी आहे तो धर्म' चालू शतकात भौतिक शास्त्रज्ञांनी शोधून काढलेल्या या समान आहे, सर्व प्राणी हे धर्माला मधाप्रमाणे आहेत. धर्म हा अखिल विश्वाचा आधार आहे. 'एखाद्याला आपला संप्रदाय नाकरता येईल, अव्हेरता येईल, त्यागता येईल; पण त्याला स्वतःचा धर्म नाकारता येणार नाही' धर्म हा अखिल मानवजातीकरता असतो. या जगाच्या भौतिक जीवनाच्या कार्यांना दिशा दाखविण्याचे काम करणारा तो धर्म. ''सदाचरण हा धर्माचा पाया आहे, ''दुसऱ्या माणसाची संपत्ती न लुबाडणे हाच धर्म होय'' ''दान देणे हाच धर्म'' ''धर्म म्हणजे जीवनाचा सर्व अंगाना स्पर्श करून कार्याला प्रवृत्त करणारा योग्य असा कायदा असतो.''आचरणसंहिता म्हणजे दुसरे काही नसून कार्याची एक पध्दत किंवा नियम असतो. त्याला आपल्या तत्त्वज्ञानात नियम न म्हणता धर्म म्हणतात' ज्याद्वारे विश्वाचे कार्य, त्याच्या विभागांचे कार्य, व्यक्तीचे कार्य एकसंध राहते असा तो धर्म असतो. धर्म ही एक शासनप्रणाली आहे तिच्यामध्ये ईश्वर किंवा त्याची

प्रतिनिधी देवता ही शासनकर्ती असते.

विश्वातील प्रत्येक वस्तूचे दुसऱ्या प्रत्येक वस्तूशी असलेले नाते व परस्परावलंबित्व तसेच ऐक्य व्यक्त करण्यासाठी धर्म अत्यावश्यक असल्याचे सूत्र उपनिषदे वापरतात: धर्म हा सर्व जीवांना मधासमान आहे, सर्व प्राणी हे धर्माला मधाप्रमाणे आहेत. धर्म हा अखिल विश्वाचा आधार आहे. 'एखाद्याला आपला संप्रदाय नाकरता येईल, अव्हेरता येईल, त्यागता येईल; पण त्याला स्वत:चा धर्म नाकारता येणार नाही' धर्म हा अखिल मानवजातीकरता असतो. या जगाच्या भौतिक जीवनाच्या कार्यांना दिशा दाखविण्याचे काम करणारा तो धर्म. ''सदाचरण हा धर्माचा पाया आहे, ''दुसऱ्या माणसाची संपत्ती न लुबाडणे हाच धर्म होय'' ''दान देणे हाच धर्म'' ''धर्म म्हणजे जीवनाचा सर्व अंगाना स्पर्श करून कार्याला प्रवृत्त करणारा योग्य असा कायदा असतो.''आचरणसंहिता म्हणजे दुसरे काही नसून कार्याची एक पध्दत किंवा नियम असतो. त्याला आपल्या तत्त्वज्ञानात नियम व म्हणता धर्म म्हणतात' ज्याद्वारे विश्वाचे कार्य, त्याच्या विभागांचे कार्य, व्यक्तीचे कार्य एकसंध राहते असा तो धर्म असतो. धर्म ही एक शासनप्रणाली आहे तिच्यामध्ये ईश्वर किंवा त्याची प्रतिनिधी देवता ही शासनकर्ती असते.

धर्म म्हणजे काय? हा प्रश्न आपल्याला कधी पडतो का? पडल्यास त्याचे काय उत्तर मिळते? मुळात हा प्रश्न पडायलाच हवा का? आजकालच्या परिस्थितीला पाहिले की आपण म्हणतो की 'त्या धर्मातच ती शिकवण आहे' मग त्याचा आणि तुमचा धर्म वेगळा का? धर्म वेगळा असतो का? वेबस्टर नुसार धर्माची व्याख्या.

"A strange belief in a supernatural power or power is that control human density"

कुठल्या धर्माला निर्माण व्हायला दोन मुख्य बाबी लागतात –

१. त्या धर्माचे तत्त्वज्ञान

२. त्या धर्माची दैनंदिनी म्हणजेच कर्मकांड

वेदांतानुसार धर्म म्हणजेच सत्य आणि धार्मिक म्हणजे त्या सत्याकडे जाणारा माणूस. देव तुम्हाला दिसला का? ह्या प्रश्नावर उत्तर देताना रामकृष्णांनी हे सांगितले व पुढे विवेकानदांना 'आत्मसाक्षात्कार' घडवून आणण्यास मदत केली. हा आत्मसाक्षात्काराकडे जाणारा मार्ग म्हणजेच हिंदू पध्दतीनूसार धर्म. धर्म म्हणजे अशी आदर्श आचरणशैली जिच्यायोगे ईश्वराच्या अस्तित्वाची सतत जाणीव रहावी. जसं वस्त्र आपण नित्य धारण करतो तसं हे आदर्श आचरण सतत अंगीकारावं. धर्माच्या विचारात प्रथम चराचराचा विचार व मग स्वत:चा विचार असावा धर्माच्या आचरणाने चराचराचं कल्याण, मग समाजाचं आणि मग स्वत:च. जसं धर्माच दृढतेने आचरण वाढेल तसा अंनताचा प्रवास सुरू होत असवा.

धर्माच्या नावाखाली आज कर्मकांड, अंधश्रध्दा वाढत जात आहे. धर्म म्हणून धर्माचा दिखाऊपणा वाढला आहे. धर्म म्हणून पूजापाठ विधी करताना, पैसा वापरला जातो, अंधश्रध्दाळू माणसे. आपल्या अडचणीचं निराकरण करण्यासाठी स्वत:ला धर्मावर जोखून देतात आणि धर्माच्या कार्यावरून कार्येकर्ते स्वत:चा विकास साधतात. पुष्कळ पैसा, गाडी बंगला घेतात आणि गरीब लोक, अंधश्रध्दाळूजन अशा अवडंबराला बळी पडतात. हे सर्व आपल्या मानवजातीला घातक आहे. यामुळे एकीकडे श्रीमंती आणि दुसरीकडे गरीबी वाढत जाते आणि याचा परिणाम आपल्या भारताच्या विकसनशीलवर होतो. आजच्या काळात तात्विक विचारापेक्षा कर्मकांडाला दिखाऊपणाला महत्त्व येत चाललेले दिसते ते आपल्या समाजाला अत्यंत घातक आहे.

**– कु. रुचाली बिराजदार**
बी.ए. भाग–१



# युवा प्रेरणास्थान : स्वामी विवेकानंद

'उठा जागे व्हा, आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका' हा यशाचा मंत्र युगानयुगे युवा पिढीमध्ये रुजविण्याचे कार्य भारतीय महान तपस्वी 'स्वामी विवेकानंद' यांनी केले. स्वकर्तृत्व व ज्ञानाच्या तेजाने मशाल पेटवून जगाला अहिंसेचा मार्ग दाखविणाऱ्या स्वामी विवेकानंदांचा जन्म १२ जाने. १८६३ रोजी कोलकत्ता येथे झाला. उत्तम मूल्यांचे संस्कार घडवून नरेंद्रनाथ दत्त चे स्वामी विवेकानंद असे रुपांतरण करण्याचे कार्य स्वामींचे पिता विश्वनाथ दत्त व माता भुवनेश्वरी देवींनी केले.

प्रतिष्ठीत व यशस्वी वकील अशी ओळख असलेले विश्वनाथ दत्त हे इंग्रजी व पर्शियन भाषेचे जाणकार होते. तसेच रामायण, महाभारत सारख्या धार्मिक ग्रंथांचे ज्ञान असलेल्या भुवनेश्वरी देवींना देखील इंग्रजी भाषेचे ज्ञान होते, म्हणूनच स्वामींच्या जीवनाला सर्वोत्तम आकार मिळून ते उच्च गुणवत्तेचे धनी झाले.

तरुण वयापासूनच आध्यात्मिक क्षेत्रात रस असल्या कारणाने स्वामींनी वेद, उपनिषद, पुराण, भवगवद्गीता अशा धर्मग्रंथांचे ज्ञान संपादित केले. त्याचबरोबर तत्वज्ञान, इतिहास, सामाजिक विज्ञान, कला व साहित्य अशा विविध विषयांचे उत्साही वाचक होते. भारतीय पारंपारिक संगीत, शारीरिक योग व क्रिडा यांमध्ये नेहमीच सहभाग नोंदवून खऱ्या अर्थाने युवांचे आदर्श म्हणून स्वामी जगविख्यात झाले.

भारतातील तरुण पिढी ही पाश्चिमात्य संस्कृतीकडे आकर्षित होत असून भारतीय संस्कृतीकडे पाठ फिरवत आहेत; परंतु रात्र कितीही अंधारमय असली तरीही पहाट ही होतेच, त्याचप्रमाणे सुविचारांचे गाढे पंडित असलेल्या स्वीमीजींच्या विचारांनी व कृतींनी देशाचे भवितव्य असलेल्या तरुणांची व संस्कृतीची नाळ जोडण्याचे कार्य केले.

Take risks in your life,
If you win you may lead,
If you loose you may guide.

या यशोमंत्राद्वारे स्वामींनी न्यूनगंडातून हार मानून स्पर्धामय जीवना पासूनच जॉन स्टुअर्ट, ह्यूम यांच्या विचाराने प्रभावित होऊन सत्याचा मार्ग अवलंबून स्वामी ब्राम्हो समाजाकडे वळले. तसेच रामकृष्ण मठ यांच्या सहकार्याने त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. स्वामींनी जीवन कौशल्यासह राष्ट्र उन्नतीसाठीही तरुणांना संबोधन केले. देशातील दारिद्र्य आणि अज्ञानाने पिडित जनतेचे दुःख सहन न होऊन भारतीय समाजाला समर्थ बनविण्यासाठी सदैवच ते कार्यरत राहिले.

स्वामी विवेकानंदांनी 'योग', 'राजयोग', आणि 'ज्ञानयोग' असे वैचारिक ग्रंथ लिहून तरुण जगाला एक नवीन मार्ग दाखविला, ज्याचा प्रभाव पिढानुपिढ्या सर्वसामान्यांवर असेल यात तीळभर शंका नाही. जगभरात आपल्या भाषणने जनतेला मंत्रमुग्ध करताक्षणी नेहमीच स्वामी विवेकानंदांनी भारतीय संस्कृतीचा उल्लेख केला.

''अंतर्गत आणि बाह्य स्वभावावर नियंत्रण मिळवून त्यांच्यातील दैवी अंशास जागृत करणे, हे प्रथम ध्येय आहे'', ''देशातील दारिद्र्य व अज्ञान घालविणे म्हणजेच ईश्वराची सेवा'' असे अगणित विचार प्रस्थापित करून १९०२ साली हे युगपुरुष स्वर्गवासी झाले. अध्यात्मिक ज्ञान, धर्म, उर्जा, समाज, शिक्षण, संस्कृती, देशप्रेम, पुण्य, परोपकार, स्वाभिमान अशा असंख्य गुणांचे मानकरीपद भूषविणारे युवापिढींचे आदर्श असे हे स्वामी विवेकानंद पुन्हा होणे नाही....

**– श्री. समर्थ अंबीगेर**
बी.ए. भाग–२



# ''स्वराज्यरक्षक : संभाजी महाराज''

१४ मे दिवशी १६५७ साली पुरंदरच्या गडावर एक रुद्र जन्मास आला. ते चकाकणारा मुख, डोळ्यातलं तेज पाहून महाराज भारावून गेले. त्याच्या काकांच्या नावरून त्यांच नाव ठेवण्यात आले. ते म्हणजे ''संभाजी''. वयाच्या नवव्या वर्षे मुघलांच्या छावणीत आपली छाप सोडणारे, आपल्या विचारांनी दिलेरखानाला धूळ चाटवणारे हे फर्जन, हे इथेच संपत नसून ही फक्त सुरवात होती.

औरंगजेबचा मोठ्या धाडसाने सामना करणारे, काय बोलावं या साहसाला, या हिमतीला, तशी सोपी नव्हती ही मोहीम, खेळण्या बागडण्याच्या वयात ते शत्रूस झुंज देत होते. सर्वांना हे माहितीच आहे की राजे औरंगजेबाच्या तावडीतून कसे सुटले परंतु इतिहासात शंभू राज्यांचा उल्लेख ही नव्हता. फसगत एवढी झालेली की महाराजांना इवलुश्या शंभू बाळाला मागे सोडून स्वराज्यात परतावं लागलं. त्यावयातही समजूतदार पणा हा केवढा...! शंभू राजांना कोणी ओळखू नये आणि ते ज्या घरात राहत होते त्यांना अडचण नको म्हणून त्यांनी आपले मुंडन करून ब्राह्मणांचा वेष धारण केला.

मोठे ते झाले पण त्यांच्यावर येणारी आव्हान दोन पटीने वाढली. सळसळतं रक्त, डोळ्यात राग, चेहऱ्यावरील तेज आणि हृदयात कवी मन, युवा अन् प्रत्येक चाल ही वाघासारखी. लहानपणी आपल्याच तेराव्याची मिठाई खाणारा तो वीर योध्दा एकच स्वप्न बाळगून जगत होता. ते म्हणजे आपल्या देवाने म्हणजेच महाराजांनी त्यांच्या आबासाहेबांनी त्यांना गनिमाला मारताना बघावं, त्यांच्या तलवारीचे हिमालयाला गवसणी घालणारे पराक्रम बघावे. चुकींच सहन होणं अशक्य, धर्मरक्षक, खरा धर्म सांगणारे हे महान राजे स्वराज्याचे रक्षक स्वराज्याचे दुसरे ''छत्रपती'' पण नेहमी सत्याला गालबोट लावणारे हे सतत त्यांच्या भोवती भिरभिरायचे. ते दुसरे तिसरे कोणी नसून धर्माचा बाजार मांडणारचे होते. नेहमी सतत शंभू राजांवर खुप घाणरेडे असह्य होणारे आरोप हे राजकारणातून करत आले आणि ते आरोप गंभीर करण्यासाठी बायकांचे प्रकरण त्यांच्या अंगावर लावायचे असंख्य प्रयत्न हे झाले. पण दूधा सारखे स्वच्छ आपले युवराज तिथून निर्दोष सुटलेच. एकही लढाई न हरणारा हा शूर आबांचा शूर छावा स्वराज्याची वाढ सहज करत होता. औरंगजेबाला हे कळून चुकले होते की संभाजी राजांना हरवणं हे अशक्य होऊन बसलंय आणि अखेरीस त्याने पाठीवर वार केलाच. आपल्या अपराजित छाव्याला अखेर आपल्याच मराठी फितुरी ने गमावलं. गणोजी शिर्के साई बाईंचे थोरले बंधू यांनी थोड्या वतनासाठी खुद्द राजांचीच फितुरी केली. त्याने राजांना नाही मराठी स्वाभिमानानला पकडवून दिले. राजांच्या देहाची अगदी चाळण करण्यात आली. स्वाभिमान पकडला पण तो मरणाला लोळवणारा वाघासारखा ठरला.

शंभू राजांची त्वचा सोलली गेली, त्यांची जीभ काढली परंतु त्यांनी माफीची भीक नाही मागितली. त्यांचे डोळे काढले परंतु ते औरंगेबांसमोर कदापी झुकले नाही. त्याचे हात कापले, तरीही त्यांनी कधी गुडघे टेकले नाही. एवढं भयंकर मरण कोणत्याच फितुराला झाल्याची इतिहासात दाखला नाही. रयतेच्या लाडक्या महाराजांच्या अभय असलेल्या पुत्राला हे मरण का........? याचा उत्तर खुद महादेवाकडे नसावं. औरंगजेबला शरमेने झुकवणारा मृत्युवरही आपले अधिराज्य गाजवणारा हा शूर छावा वयाच्या ३२ व्या वर्षी स्वराज्याला अखेरचे वंदन करत देह सोडला.

आयुष्यात काही चुकीचे करत असाल तर शंभू राजांबद्दल विचार करा. त्यांनी दिलेल्या बलिदानाची आठवण करा, तुमचे पाय नक्कीच मागे फिरतील. कारण मृत्यूला हरवणारा आयुष्यात अपराजित असलेला आणि शत्रूला हारूनही कौतूक असलेला एकच छावा झाला.

**– कु. माया निलाप्पा पवार**

बी.ए. भाग–२

# 'मराठी वाङ्‌मयाची समृध्द परंपरा'



**माझा मराठीची बोलु कौतुके**
**परि अमृताते ही पैज जिंके**

समृध्द मराठीची परंपरा आणि मराठीच्या भवितव्याची चिंता करणे खरेच योग्य आहे का? मराठी भाषेचे काय होणार याविषयी काळजी करण्यापेक्षा नव्या पिढीला आणि लहाना मुलांना तिची गोडी कशी लागेल याची जाणीव होण्याची आता वेळ आहे. मराठी ही आपली बोलीभाषा आहे. तशीच ती राज्यभाषा आहे.

मराठी भाषेविषयी दोन विभिन्न मतप्रवाह अनुभवायाला मिळतात. पहिला प्रवाह मराठीच्या भवितव्याविषयी शंका व्यक्त करणारा तर दुसरा मतप्रवाह बोलण्यातून, वागण्यातून, अविष्कारातून मराठी भाषेची आणि संस्कृतीची पाळेमुळे भक्कम करणारा आणि मराठीच्या भविष्यतव्याविषयी साशंकता न बाळगणारा आहे. मराठी भाषेची प्राचीन स्वरूप तिचे विविधांगी प्रवाह, परंपरा, व्यापकत्व, वाङ्‌मनिर्मिती, तिच्या बोलीभाषा अशा विविध अंगाने भाषेचा विचार होताना भाषेचे सौंदर्य महत्त्वाचे ठरते. एका अर्थाने भाषा हीच संस्कृतीची वाहक असते. ज्ञानगंगेचा प्रवाह अखंड चालू ठेवण्याची आणि समाजजीवनाला प्रगत करण्याची कामगिरी भाषेलाच करावी लागते. वैज्ञानिक दृष्टीने पहिल्यास भाषा हे केवळ समाजव्यवहारात नाही तर विचारांचेही साधन आहे. बोलीभाषासारखे अनेक प्रवाह इतर विविध भाषामधील शब्द संकल्पना मूळभाषेला येऊन मिळतात आणि भाषा समृद्ध होते.

मराठी भाषेची प्राचीनता दोन हजार वर्षापेक्षाही अधिक आहे. या संदर्भात नाणेघाटात सापडलेला शिलालेख हा बावीसशे वर्षापेक्षा जूना आहे. तिच्यातील वाङ्‌मय निर्मितीलाही हजारो वर्षांची परंपरा आहे आणि वाङ्‌मयनिर्मितीही व्यापक आहे. ''खरे तर नव्या युगाची आव्हाने पेलण्याचे सामर्थ्याविषयी साशंक असणारी आम्ही तिची अपत्ये मात्र दुबळी आहोत'' हे १९८९ च्या जागतिक मराठी परिषदेतील कुसुमाग्रजाचे वाक्य आहे.

मराठीला खूप बोलीभाषा लाभल्या आहेत. प्रसिध्द भाषा संशोधक डॉ. गणेश देवी यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतामध्ये १९६१ मध्ये ११०० बोलीभाषा होत्या. गेल्या पाच-सहा दशकांत त्यातील ३०० बोलीभाषा संपुष्टात आल्या. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर बोलीभाषा मरण पावण्याचे प्रमाण कमी आहे. महाराष्ट्रात आजही ५३ बोलीभाषा आहेत. डॉ. देवी यांच्या या विधानाला पुष्टी देणारा संत नामदेवांचा एक अभंग आहे. त्यात त्यांनी 'ज्ञानेश्वरी' ची महती सांगताना,

ज्ञानराज माझी योग्यांची माउली ।
जेणे निगमवली प्रगट केली ।
छपन्न भाषेचा केलासे गौरव ।
भवार्वावी नाव उभारिली ।।

मराठीच्या अनेक बोलीभाषा आहेत. मौखिक परंपरेचा मूळ स्त्रोत मुख्यत्वे या बोलीभाषातून आला आहे. बोलीभाषा हीच त्या त्या लोकसंस्कृती टिकवून ठेवते. बोलीभाषेने मूळ भाषेला किंवा प्रमाण भाषेला अजिबात कमीपणा येत नाही. उलट अशी बोलीभाषा ही माय भाषेचे सत्व पोसते आणि योग्य अन्वर्थक शब्दांची मायभाषेला उणीव भासते त्यावेळी ती धावून येते. कितीतरी म्हणी, वाक्यप्रचार, लोकोक्ती हे बोलीभाषेतून प्रमाण भाषेत आले आहेत.

समृध्द ग्रामजीवन हा भाषेचा पाया आहे. मराठीच्या बोलीभाषेने आणि मौखिक परंपरेने एक मोठी लोकसंस्कृती उघडी केली आणि सांस्कृतिक अंगाने मराठी भाषा टिकवली. महाराष्ट्राची संस्कृती ही लोक संस्कृतीवर आधारलेली आहे आणि ही लोकसंस्कृती हजारो खेड्यांत नांदणाऱ्या लोकजीवनाची सांगाती आहे त्यातूनच लोकसंस्कृती उभे करणारे समृध्द ग्रामजीवन हा देखील मराठी भाषेच्या भक्कमतेचा पाय असू शकते मराठी भाषेचे रूप, स्वरूप आणि सौंदर्य उभे करताना सर्वांत पुढे डोळ्यांसमोर उभे राहतात ते संत ज्ञानदेव, संत तुकाराम ज्ञानदेवांच्या अगोदर मराठीमध्ये वाङ्मयनिर्मिती झाली नाही असे नाही. ज्ञानेदवांनी 'ज्ञानेश्वरी' च्या माध्यमातून अभंग, ओवी, गौळण, विरहीणी, भारूडे या वाङ्मय प्रकारांची आद्य रचना करून सारस्वताचाही पाया घातला.

मराठीत आख्यानपर काव्यलेखनाची परंपरा नावानी सुरू केली विशालता, तत्वचिंतन त्याचबरोबर लोकभूमिकांच्या बोली अविष्करण नाथांच्या वाङ्मयात दिसते. संत साहित्याबरोबर लोकसाहित्य आणि लोकरपंरपरेतून आलेली मौखिकतेची स्वाभाविक रसाळता तर अभंग, ओवी बरोबरच लावणी, फटका, पोवाडा, म्हणी, वाक्यप्रचार, लोककथा, पुराणकथा, हरिकथा, सांगीवांगीच्या गोष्टी तर वासुदेव, गोंधळी, भराळी, पांगुळा यासारख्या लोकभूमिकेच्या माध्यमातून प्रकटलेली मौखिक वाणी हे मायबोलीचे स्वाभाविक आणि रांगडे सौंदर्य ठरले त्याने मराठी भावविश्व फुलविले एकीकडे जांभेकर, लोकहितवादी, रानडे, आगरकर, महात्मा फुले यासारख्या सुधारकांच्या विचारतत्वाने बुध्दी प्रमाण्यावादाची कणखर मूल्ये देणारी मराठी लाभली. त्यानंतर आधुनिक मराठी आली.

शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असले, तरी अभिव्यक्तीचे माध्यम मात्र मराठीच आहे आणि हो अभिव्यक्ती कुटुंब, समाज, संस्कृती आणि लोकजीवन यांच्याशी जोडली गेली आहे.

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने
शब्दाचीच शस्त्रे यत्न करू ।। १ ।।
शब्दाची आमुच्या जीवाचे जीवन
शब्द वाटू धन जनलोका ।। २ ।।
तुका म्हणजे पहा शब्दचि हा देव
शब्देचि गौरव पूजा करू ।। ३।।

**– कु. रुचाली बिराजदार**

बी.ए. भाग–१



# स्त्री सक्षमीकरण

